


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : २७२ वा शनिवार दि १० जानेवारी २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# भ्रष्टाचारी तितुका मेळवावा, चुनावी हिंदुत्व अन् रावणाचा पक्षप्रवेश- उद्धव ठाकरे....

वृत्तसंस्था/ नाशिक

राज्यात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची युती झाल्यानंतर पहिली जाहीर सभा ही आज नाशकात पार पडली. यावेळी शिवसैनिक आणि मनसैनिकांनी मोठी गर्दी केली होती. या सभेत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी भाजपवर चांगलाच हल्लाबोल केला. भाजप हा आज उपटचुंबांचा पक्ष झाला आहे, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जळजळीत टीका केली. तसेच, कुंभमेळ्यासाठी झाडे कापण्याच्या मुद्द्यावरूनही ठाकरेंनी भाजपला सुनावलं. इतकंच नही तर भाजप रावणालाही पक्षात घेईल, असं म्हणत ते अक्षरशः भाजपवर तुटून पडले. गेल्या दोन वर्षातील चौथी सभा, आजच्या सभेचा अधिक आनंद आहे. कारण माझ्या सोबत माझा भाऊ मनसे प्रमुख राज ठाकरे आहे. उद्याच्या महापालिकेतील भावी नगरसेवकांना सांगतो की जनता तुमच्याकडे अपेक्षेने पाहते, त्यांच्या व्यथा राज आणि संजय राऊत यांनी केलाच. राज ठाकरे यांनी सांगितलं की त्यांच्याकडे ही महापालिका असताना काय कामं केली, राजने नाशकात केलेली कामं आणि मुंबईत शिवसेनेने केलेली कामं. हे नागरिकांसाठी काम करणारे दोन्ही भाऊ एकत्र आले तर नाशिकचा काय उत्कर्ष होईल याचा तुम्ही विचार करा, असं उद्धव ठाकरे म्हणाले. पाणी टंचाई, कचरा, बेरोजगारी, गुंडगिरी वाढते आहे, सगळीकडे समस्या त्याच आहेत. राज्यात कुठल्याही शहरात गेलं तरी त्याच समस्या आहेत. हे गेल्या दहा वर्षात मोदींच्या काळात घडल्या. मला सगळे विचारत आहेत की एकत्र का आलात, जेव्हा एकत्र नव्हतो तेव्हा विचारायचे एकत्र कधी येणार, आता एकत्र आलो तर म्हणतात एकत्र का आलात? तुमच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे का, तर आमच्या अस्तित्वाचा विचार तुम्ही करु नका, शिवसेनेला ६० वर्ष होणार, अनेक निवडणुकी लढवल्या, पराभव पचवला, विजय थोडा नशिबी आला तरी शिवसेना संपली नाही. मग आमचं अस्तित्व ठरवणारे तुम्ही कोण? ज्या शहरात निवडणुका आहेत, त्या शहरातील नागरिकांनी त्यांचं आणि त्यांच्या भावी पिढीचं आयुष्य कसं असणार आहे. हे ठरवणार ही निवडणूक आहे. आम्ही पोटतिडकीने का तुमच्यासाठी प्रयत्न करत आहोत. मला एक प्रश्न विचारायचं आहे, भाजपचं हिंदुत्व हे खरं हिंदुत्व आहे का चुनावी हिंदुत्व आहे. राम मंदिर बांधलं म्हणून तुम्ही डंका पिटला, आणि प्रभू रामचंद्र जिथे तपश्चर्येला बसले होते, ती सगळी झाडं कापली, उद्या कोणी विचारलं की राम कुठे राहिले होते, तर काय सांगणार हे नमो भवन आम्ही केलं आहे, संपूर्ण सत्यानाश करायचा, धर्माची पट्टी अशी लावायची की सगळे अंध भक्त झाले, तुमच्यावर मोहिनी टाकायची की स्वप्नात गुंतवून टाकायचं. देवेंद्र फडणवीस ज्यांनी हे शहर दत्तक घेतलं होतं, राज बरोबर बोलला ज्यांना राजकारणात पोरं होत नाही, त्यांना आमची पोरं दत्तक घ्यावी लागत आहेत. हे काय शहर दत्तक घेणार? म्हणून महोन भागवतांना टाहो फोडावा लागतोय की अपत्य वाढवा, अपत्य वाढवा म्हणजे तुमच्या राजकारणातले अपत्य वाढवा. त्यांचं तेवढं तरी ऐका. भाजप हा आज उपटचुंबांचा पक्ष झाला आहे. आमच्याकडे पोरांचा तोटा नाहीये. अस्सल निष्ठावान अजूनही इथेच आहेत. आम्ही मोठी केलेली माणसं गेली, पण ज्यांनी मोठी केली, ते इथेच आहेत.मला भाजप वाल्यांना विचारायचं आहे. काय आलंय तुमच्या, या उपटचुंबांच्या



सतरंज्या उचलायच्या, आमच्यात असताना भ्रष्टाचाराचे आरोप करायचे. तुम्हाला पक्ष वाढवायला कुत्ता चालतो, बिल्ली चालते, चुहा चालतो. अशी बरबटलेली माणसं पक्षात घ्यायची आणि त्यांची लंगोट साफ करुन त्यांना डोक्यावर घेऊन नाचायचं, हे निष्ठावंत भाजप वाल्यांच्या नशिबी आलं आहे, कसं तुम्ही राहाताय, हा भाजप तुम्हाला अपेक्षित होता? मला भाजपच्या निष्ठावान कार्यकर्त्यांचं वाईट वाटतंय. देवयानी फरांदे यांना रडू आवरेना, मला त्यांच्याबद्दल आदर, ज्या पक्षाशी निष्ठा तुम्ही बाळगता तो पक्ष आज उपऱ्यांचा पक्ष झाला आहे. भाजप आज दलालांचा पक्ष झाला आहे. पक्षात चोर दरोडेखोर येत आहेत. ज्या रावणाला प्रभूरामाने मारलं त्या रावणालाही हे पक्षात घेतील इतके निर्लज्ज झाले आहे हे, कुठे आहे यांचं हिंदुत्व. पाठीत वार केल्यानंतर मी कांग्रेससोबत गेलो, तेव्हा उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडलं, मग भाजपने अकोटमध्ये एमआयएमसोबत युती केली. तेव्हा काय सुटलं नाही तुमचं, की काही नव्हतंच सुटायला. अंबरनाथमध्ये कॉंग्रेससोबत युती केली.

# बुलढाणा आरोग्य व पर्यावरण विषयक जनजागृती कार्यक्रम यशस्वी...

जनसंचलन/बुलढाणा


बुलढाणा शहरातील आशिर्वाद हॉस्पिटल यांच्या वतीने व हॅपी रिव्हर कम्युनिटीच्या सहकार्याने पाणी प्रदुषण व प्लास्टिक कचरा व्यवस्थापन या गंभीर विषयांवर आधारित जनजागृती कार्यक्रम नुकताच यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमात दूषित पाणी व वाढता प्लास्टिक कचरा यामुळे मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. विशेषतः दूषित पाण्यामुळे व प्लास्टिकमधील घातक रसायनांमुळे उद्भवणारे गंभीर आजार, त्यात कर्करोगासारख्या आजारांचा धोका कसा वाढतो, याबाबत शास्त्रीय पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. यामुळे उपस्थित नागरिक, आरोग्यसेवा कर्मचारी व वैद्यकीय कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून हॅपी रिव्हर कम्युनिटीचे सह-संस्थापक व माजी नेव्हिगेशन ऑफिसर श्री. अनुप गवळी उपस्थित होते. त्यांनी पाणी प्रदूषणाची वाढती समस्या, प्लास्टिक वेस्टचे पर्यावरण व आरोग्यावर होणारे दुष्परिणाम तसेच या समस्यांवर उपाय म्हणून प्रत्येक नागरिकाने घ्यावयाची वैयक्तिक व सामाजिक जबाबदारी यावर प्रभावी मार्गदर्शन केले. स्वच्छ पाणी, प्लास्टिकमुक्त जीवनशैली आणि सामूहिक कृतीचे महत्व त्यांनी ठळकपणे अधोरेखित केले. हा जनजागृती कार्यक्रम आशिर्वाद हॉस्पिटल, बुलढाणा येथे पार पडला. डॉ. सुरेश एम. छाजेड सर व त्यांच्या कुटुंबीयांच्या पुढाकारातून कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. उपस्थितांनी कार्यक्रमाचे विशेष



कौतुक करत, अशा प्रकारच्या आरोग्य व पर्यावरण विषयक उपक्रमांची समाजाला नितांत गरज असल्याचे मत व्यक्त केली.

# रंग उगवत्या दिल्लीचे...

सत्तेचा उदय आणि अस्त अशा अखंड चक्रात बारा महिने आणि तिन्ही त्रिकाळ गुरफटलेलं महानगर असलेल्या दिल्लीला स्वतःचं असं स्थिर हवामानच नाही, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. ऋतू, राजकारण, प्रदूषण आणि लोकसंख्या यांचा इथे नेहमीच गोंधळलेला संवाद सुरू असतो. पण या सगळ्या कोलाहलाच्या पलीकडे दिल्लीचं एक वेगळंच रूप दिसतं - ते उगवतीच्या किरणांच्या साथीनं. गोठवणारं तापमान, दिवसभर सूर्यदर्शनही दुरापास्त करणारं दाट धुकं आणि त्यात प्रदूषणाचा जणू तेरावा महिना - अशा सध्याच्या काळात पहाटेची, नुकतीच फटफटू लागलेली आणि त्यानंतरच्या तास-दोन तासांतली दिल्ली ही राजकारणाच्या चौकटीपलीकडची, अधिकार आणि अधिकारी यांच्या चिमटीत न मावणारी वाटते. ही दिल्ली जणू स्वतःकडे पाहणारी आणि स्वतःशीच बोलणारी असते. रात्र संपलेली असते, पण किमान हिवाळ्यात तरी दिवस लगेच समोर येत नाही. अभिजात संगीताच्या भाषेत सांगायचं तर, हा विभास, ललत आणि तोडी या रागांचा मधला, हिंदोळणारा काळ असतो. जणू धुकं स्वतःच ठरवत असावं, कधी उजाडायचं, कुठे थांबायचं आणि कुठे विरघळायचं डोळे आणि कान उघडे ठेवून या मधल्या थांब्यातच खरी दिल्ली नजरेला पडते. इंडिया गेट असो, पटेल चौक असो, अकबर रोड असो की तीन मूर्ती - ब्रिटिश काळातील रचनेच्या असंख्य गोल चक्कर असलेल्या या भागांत उगवत्या किरणांबरोबरच जॉगिंगसाठी आलेले, योगा करणारे, चालायला निघालेले, लाडक्या कुत्र्याला फिरवणारे असे नाना कळांचे चेहरे दिसू लागतात. उगवती दिल्ली आवाजाने नव्हे, तर रिकामेपणाने ओळखली जाते. रस्ते कालचेच असतात- कालची धूळ, कालची पावलं, कालची घाई; पण त्यावर चालणारी माणसं नवी असतात. दूधवाले, पेपरवाले सायकलवरून किंवा बाईकवरून निघालेले असतात. मेट्रो स्थानकांचे दरवाजे हलकेच किरकिरत उघडतात. दिवसात अगदी पहिल्यांदा सुटणाऱ्या बसगाड्या एखादी फेरी मारून जातात. सोसायट्यांमध्ये चारचाकी गाड्या साफ करणाऱ्यांची लगबग सुरू होते. जिथून रेल्वे लाइन जाते तिथे अंधाराचं जाळं चिरत जाणारी रेल्वेची शिट्टी अधिकच कर्कश वाटते. एखादा सफाई कर्मचारी मधूनच आठवण आल्यासारखा झाडूचा फटकारा मारतो आणि पुन्हा धुक्यात गायब होतो - कुणाकडेही न पाहता. हे सगळं पाहिलं की वाटतं, जणू दिल्ली दरवाजा उघडण्याची ही पहिली वर्दी असावी. रस्त्यावरचे भटके कुत्रेही स्वप्नातला पसारा आवरत फुटपाथ गाठायला लागतात. खरं तर या वेळेला दिल्ली कुणाचीच नसते - ना सत्तेतल्यांची, ना विरोधातल्यांची. फिरोजशहा रस्त्यावर सलीमच्या चहाच्या टपरीवर पहिला गॅस पेटतो. उकळत्या पाण्याचा आवाज आणि पहिलं गिराईक - बहुतेकदा रिक्षावाले काका - यांच्यातलं पहाटेचं बोलणं हा दिवसाचा पहिला सार्वजनिक संवाद ठरतो. पावणेसातनंतर मेट्रोच्या पायऱ्यांवरची वर्दळ वाढते. सामान्यतः वाहतुकीचा सेन्स कमी असलेली दिल्ली या वेळेत मात्र शिस्तीत धावते. धुक्याचं राज्य प्लॅटफॉर्मपर्यंत पसरलेलं असतं, तरीही स्वतः च्या वेळेत अडकलेले लोक एकमेकांवर आदळत नाहीत. कदाचित म्हणूनच उगवती दिल्ली वर्तमानाला फारसा थारा देत नाही; हा तिचा सर्वांत दुर्लक्षित, पण सर्वात प्रामाणिक काळ असतो. हळूहळू लालसर सूर्यबिंब वर येतं. मना कल्पवेना जयाच्या त्वरेशी - सूर्यही लगेच उघड होत नाही. तो आधी काचांवर, इमारतींच्या भिंतींवर, थांबलेल्या गाड्यांच्या आरशांवर किरण पाठवतो, जणू या राजकीय राजधानीचं बरं चाललंय ना अशी खात्री करून घेतो. या राजधानीत आजही पदपथांवर, मेट्रोच्या खांबांच्या आडोशाला, रुग्णालयांबाहेर उघड्या आकाशाखाली रात्र काढणारे हजारोंच्या संख्येने आहेत. वाहनांचे आवाज वाढले की हे लोक उठतात. कुणी अंग चोळतं, कुणी पिशवी आवरतं. यमुनाजळे काळीच असली तरी त्या थंड पाण्यात अंघोळ करणारेही दिसतात. रोजीरोटीची लढाई करणाऱ्यांसाठी दिवसाची उगवण म्हणजे नवी



संधी नसते; तो फक्त पुढचा तास असतो. एखादा दानशूर चहा वाटायला आला की रांगेत उभे राहा म्हणत त्याचे कार्यकर्ते धावतात. याच वेळी शाळांच्या बसगाड्या रस्त्यांवर उतरतात. स्वेटर, कानटोपी घातलेली बच्चे कंपनी आणि झोपमोड झालेल्या पालकांचे चेहरे दिसतात. मुलांच्या पाठीवर दप्तरं असतात, पण डोळ्यांत अजून झोप असते. बसस्टॉपवर उभे चेहरे तर जणू एकसारखेच वाटतात. ही उगवती दिल्ली नायक घडवत नाही, देवदूत जन्माला घालत नाही. पण या वेळेला ती खोटं बोलत नाही, नसावी. दिव्यांआड लपलेला नाटकीपणा उगवत्या उजेडात टिकवण्याचा आटापिटा किमान या प्रहरात तरी ती करत नाही. सत्ता, संस्कृती किंवा इतिहास यांच्यापलीकडे जाऊन ही दिल्ली रोज, दर उगवतीला, नव्याने उभी राहणारी - शरीरानं जीवट आणि मनानं चिवट - कोट्यवधींची सवय बनून जाते. हिमालयात बर्फवृष्टी झाली, की दिल्ली हुडहुडते आणि राजस्थानपलीकडच्या उष्ण वाऱ्यांबरोबर ताप सहन करते - हे चक्र नित्याचंच. पण वर्षाची सुरुवात करताना या उगवत्या प्रहरातले काही रंग टिपता आले, तर उरलेले दिवस राजकारणाच्या चर्वणासाठी मोकळे असतातच!






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# राष्ट्रवादीच्या फुटीनंतर अडीच वर्षांनी पहिल्यांदाच काका-पुतण्या एकाच मंचावर

**पिंपरी-चिंचवड :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांचे पुतणे आमदार रोहित पवार हे पक्षफुटीनंतर पहिल्यांदाच एका राजकीय मंचावर एकत्र आले. पिंपरी - चिंचवडमधील सांगवी येथे झालेली प्रचार सभा निमित्त ठरली.पिंपरी-चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्रितपणे निवडणूक लढवत असून, दोन्ही गटांचे नेते आणि कार्यकर्ते एकमेकांच्या उमेदवारांचा प्रचार करताना दिसत आहेत. येत्या काही दिवसांत खासदार सुप्रिया सुळे या देखील रस्त्यावर उतरून अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस (घड्याळ चिन्ह) उमेदवारांच्या प्रचारात सहभागी होणार असल्याची माहिती आहे.प्रेमात आणि युद्धात सर्व काही माफ असत,ङ्घ असं म्हटलं जातं. त्याचप्रमाणे राजकारणातही हे चित्र सध्या स्पष्टपणे पाहायला मिळत आहे. या सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील भ्रष्टाचारावर बोट ठेवत स्थानिक नेत्यांवर गंभीर आरोप केले. गुंडगिरी आणि दादागिरी करणाऱ्यांना धडा शिकवणार, असा इशारा अजित पवार यांनी दिला.



तर आमदार रोहित पवार यांनी केजीएफ चित्रपटाचा संदर्भ देत अजित पवारांना पिंपरी-चिंचवडकरांसाठी 'रॉकी भाई' असे संबोधले. तसेच आमदार महेश लांडगे आणि आमदार शंकर जगताप यांची तुलना केजीएफमधील 'गरुडा' या पात्राशी केली.रोहित पवार म्हणाले, ङ्घपिंपरी-चिंचवडमध्ये स्थानिक नेत्यांनी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला आहे. भाजपला सत्तेबाहेर काढण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र आले आहेत. कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन, त्यांच्या आग्रहामुळेच आम्ही एकत्र आलो आहोत.ङ्घहिंदू संस्कृतीत परिवाराला फार महत्त्व आहे. परिवार एकत्र राहावा, ही आपली परंपरा आहे,ङ्घ असे सूचक विधानही त्यांनी यावेळी केले. ङ्घअजित पवारांनी स्पष्ट केले आहे की आम्ही ही निवडणूक एकत्र लढवत आहोत. महानगरपालिका निवडणुकीनंतर जिल्हा परिषद निवडणुका असतील, त्या वेळीही संबंधित जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी सांगितले, तर एकत्र लढण्यास हरकत नाही,ङ्घ असे रोहित पवार म्हणाले.

पवार परिवार एकत्र राहावा, ही माझीही इच्छा आहे. राजकारणात सर्व काही कायमस्वरूपी घडतेच असे नाही. मात्र या निवडणुकीत दोन्ही पक्ष एकत्र आले, ही चांगली बाब असून मी त्याचे स्वागत करतो. उद्या काय होईल, हे सांगता येत नाही,ङ्घ असेही त्यांनी स्पष्ट केले.

महेश लांडगे यांच्या टीकेवर प्रतिक्रिया देताना रोहित पवार म्हणाले, महेश लांडगे काय बोलतात, याकडे मी लक्ष देणार नाही. स्थानिक नागरिक त्यांना भ्रष्टाचारात बरबटलेला बोका म्हणतात.

भाजप आमदार शंकर जगताप यांच्याबाबतही त्यांनी आरोप करताना सांगितले की, ङ्घकेजीएफ चित्रपटातील गरुडाप्रमाणेच छोटे-मोठे कॉन्ट्रॅक्ट आणि कामांवर नियंत्रण ठेवण्याचे काम पिंपरी-चिंचवडमध्ये सुरू आहे. रिंग करून पैसे कमावण्याचे प्रकार होत आहेत. या दोघांना असे वाटते की पिंपरी-चिंचवडवर त्यांचे साम्राज्य आहे. मात्र चित्रपटातील रॉकीप्रमाणे अजित दादा गुंडगिरी आणि कॉन्ट्रॅक्ट राजवटीविरोधात लढत आहेत,ङ्घ असा दावा रोहित पवार यांनी केला.

एमसीए संदर्भातील प्रकरणावर बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, एमसीएमध्ये कोणतेही अनधिकृत किंवा गैरप्रकार झालेले नाहीत. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून सर्व काही कायदेशीर आहे. विरोधी गटाने राजकीय दबाव टाकत न्यायालयात धाव घेतली आहे. परिवारातील दहा-वीस लोक एखाद्या संस्थेत असतील, तर त्यात गैर काही नाही. संबंधित सर्वजण उच्चशिक्षित आहेत. ४ फेब्रुवारीला न्याय मिळेल, असा विश्वास आहे, असेही त्यांनी सांगितले.

## रामकृष्ण हरी, निलेश लंके यांना बसवा घरी' ; कवाडेंची फटकेबाजी

**अहिल्यानगर :** अहिल्यानगरचे राजकीय वातावरण प्रचंड तापले आहे. महायुतीच्या प्रचारासाठी आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जाहीर सभेत पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे नेते जयदीप कवाडे यांनी खासदार निलेश लंके यांच्यावर विखारी शब्दांत हल्लाबोल केला. 'अहिल्यानगरचे खासदार कोण आहेत, हे पाहीलं तर ते ग्रामपंचायतीचे सदस्यही वाटत नाहीत,' अशा शब्दांत त्यांनी लंके यांचा एकेरी उल्लेख करत उपरोधिक टोला लगावला.विरोधकांकडून सभांमध्ये होणाऱ्या 'रामकृष्ण हरी' या जयघोषाचा समाचार घेताना जयदीप कवाडे म्हणाले की, शरद पवार गटातील नेते सभांमध्ये हात वर करून घोषणाबाजी करतात. मात्र, आता वेळ आली आहे की नगरकरांनी 'रामकृष्ण हरी, निलेश लंकेला बसवा घरी' अशीच घोषणा दिली पाहिजे. त्यांच्या या विधानाने सभास्थळी टाळ्यांचा कडकडाट झाला आणि राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली.कवाडे यांनी आपल्या



भाषणात माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांची पाठराखण केली. 'नगरकरांच्या कोणत्याही कामासाठी जनता आजही मनातील खासदार म्हणून डॉ. सुजय विखे यांच्याकडेच जाते. सुजय दादा जनतेची कामे तत्परतेने पूर्ण करून दाखवतात,' असे सांगत त्यांनी विखेंच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले.'रामकृष्ण हरी, सुजय दादा असल्यामुळे डोन्ट वरी,' असे म्हणत त्यांनी महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह भरला. निवडणुकीच्या तोंडावर खासदारांवर थेट वैयक्तिक स्वरूपाची टीका झाल्याने आता शरद पवार गट आणि निलेश लंके समर्थक याला काय प्रत्युत्तर देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ४० वर्षांनी राज ठाकरे गेले शाखेत

**ठाणे :** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते अनावरण करण्यात आलेल्या ठाण्यातील चंदनवाडी येथील शिवसेना शाखेला मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुरुवारी (८ जानेवारी) भेट दिली. विशेष म्हणजे राज ठाकरे यांनी तब्बल ४० वर्षांनी शाखेला भेट दिली. राज ठाकरे ठाणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आणि मनसेच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी आज ठाण्यात आले. यावेळी त्यांनी ठाकरेंच्या शिवसेनेच्या शाखेला देखील भेट दिली. यावेळी राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या शाखेतील मस्टरवर सही केली. शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबईत शाखा भेटींचा धडाका लावलेला असताना ठाण्यातही 'ठाकरे ब्रँड'चा प्रचार करण्यात आला. यावेळी राज यांनी टेंभीनाका येथे शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या पुतळ्याला अभिवादन केले.

## भाजपच्या धोरणांवर चव्हाणांची टीका

**पुणे :** काँग्रेसच्या सत्ताकाळात जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण योजनेतून (जेएनएनयूआरएम) पुण्यासाठी कोट्यवधींचा निधी मिळवून दिली. त्यानंतर, भाजपच्या काळात स्मार्ट सिटीपासून ते हायपर लूपपर्यंत फक्त घोषणाच झाल्या. घोषणा करून पैसे काढायचे आणि लोकांच्या डोळ्यात धूळफेक करायची, हाच यांचा उद्योग आहे', अशा शब्दांत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सत्ताधाऱ्यांवर गुरुवारी तोफ डागली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यासाठी ८० हजार कोटी रुपयांच्या योजनांची घोषणा केली होती. त्याचा चव्हाण यांनी समाचार घेतला. 'घोषणा करायला पैसे लागत नाहीत. याच नेत्यांनी स्मार्ट सिटी, हायपर लूपची घोषणा केली. त्याचे पुढे काय झाले? केवळ घोषणा करायच्या आणि त्यातून पैसे काढायचे व लोकांच्या डोळ्यात धूळफेक करायची, असे उद्योग सुरू आहेत', असे ते म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप एकच असून ते पुणेकरांना फसवत आहेत. त्यांनी जागा जिंकण्याच्या भाषेपेक्षा त्या वाटून



घ्याव्यात. पुणेकरांनी पूर्वी काँग्रेसच्या सत्ताकाळात झालेला विकास पाहिला आहे. भाजपचा गैरकारभारही पाहिला आहे. त्यामुळे जनतेने पाच वर्ष काँग्रेसला संधी द्यावी, असे आवाहन सतेज पाटील यांनी केले. विलासराव देशमुख यांच्यावर रवींद्र चव्हाण यांनी केलेली टीका म्हणजे वैचारिक दिवाळखोरी आहे, असेही ते म्हणाले. काँग्रेसच्या पुण्यासाठीच्या जाहीरनाम्याच्या प्रकाशनानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी भाजपच्या कारभारावर टीकास्त्र सोडले. या वेळी माजी मंत्री बंटी पाटील उपस्थित होते.तीन पक्षांच्या महायुती सरकारकडून पुण्याचे लचके तोडले जात आहेत. हे सरकार केवळ भ्रष्टाचारात गुंतले आहे. कोणाला किती वाटा मिळणार याकडेच त्यांचे लक्ष आहे.

## महाराष्ट्राचा आता बिहार व्हायला लागलाय ; प्रकाश आंबेडकर

**सोलापूर :** 'महाराष्ट्रातील राजकारणातून आता तत्व आणि विचार पूर्णपणे संपले असून केवळ सत्ता आणि टेंडरसाठी अभद्र युती केल्या जात आहेत. राजकारणात आता खुनांपर्यंत मजल गेली असून महाराष्ट्राचे आता 'बिहार' व्हायला लागले आहे,' असा खळबळजनक आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. सोलापूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.यावेळी बोलताना प्रकाश आंबेडकरांनी राष्ट्रवादीतील फुटीवर खोचक टिप्पणी केली. 'शरद पवार आणि अजित पवार हे दोघेही वेगळे नसून ते एकत्रच आहेत. त्यांनी मिळून भाजपला 'उल्लू' बनवले आहे. केवळ स्वतःच्या चौकशा थांबवण्यासाठी त्यांनी हे सर्व केले असून, भाजपने आतापर्यंत त्यांच्या केसेस दाबून का ठेवल्या, याचे उत्तर द्यावे,' असे



आव्हान आंबेडकरांनी दिले.राज्यातील बदलत्या राजकीय संस्कृतीवर भाष्य करताना आंबेडकर म्हणाले की, 'आता पक्ष आणि विचार महत्त्वाचा राहिला नसून केवळ सत्ता आणि त्यातून मिळणारे टेंडर महत्त्वाचे झाले आहे. टेंडर मिळवण्यासाठी निवडून आले पाहिजे आणि त्यासाठी खूनही केले जात आहेत. हे चित्र महाराष्ट्राला बिहारच्या दिशेने नेणारे आहे. वंचितच्या अर्ध्या उमेदवारांना धमकावून अर्ज भरण्यापासून रोखण्यात आले,' असा गंभीर आरोपही त्यांनी केला.सोलापुरातील 'बिनविरोध' निवडणुकीच्या परंपरेवर बोलताना आंबेडकरांनी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनाही लक्ष्य केले. 'शिंदे यांनीही यापूर्वी स्वतःला बिनविरोध निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले होते. मात्र, तेव्हा चळवळीतील उमेदवार मळ्पा शिंदे ठाम राहिल्याने त्यांचा प्रयत्न फसला होता,' अशी आठवण त्यांनी करून दिलीखासदार प्रणिती शिंदे यांनी 'माझ्या रक्तात काँग्रेस आहे' असे वक्तव्य केले होते. त्यावर सुजात आंबेडकरांच्या आरोपांचा संदर्भ देत प्रकाश आंबेडकर म्हणाले की, 'कुणाच्या रक्तात किती भाजप आहे, हे लवकरच दिसेल. दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आंटी को छेडता है क्या?' म्हणत चौघांकडून तरुणाचं अपहरण, नंतर अमानुषपणे मारहाण

**छत्रपती संभाजीनगर :** काम संपवून घराकडे जात असलेल्या एका युवकाने तीन जणांनी बुलेटवर बसवून नेले. भीम टेकडी परिसरात हमारे आंटी को छेडता है क्या? असे सांगत युवकाला लोखंडी रॉडने, तसेच चाकु हल्ला करून अमानुषपणे मारहाण करून गंभीर जखमी अवस्थेत मकई गेट परिसरात फेकून दिले. अमानुषपणे मारहाणीत युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना २ जानेवारी रोजी ६.४५ ते ७ जानेवारीच्या दुपारी १.३० वाजेच्या दरम्यान घडली. मृत युवकाचे नाव अनिकेत अण्णा राऊत (वय १९, रा. रमाईनगर, हर्सुल) असे आहे. तर खून करणाऱ्या आरोपींचे नाव संकेत मोतीलाल गायकवाड(वय २४ ), विकास शेषराव वाघमारे (वय २१), आदित्य राजू आव्हाड (वय १८ वर्ष, रा. तिघेही , रा. एकता नगर, हर्सूल) असे आहे.

या प्रकरणात अण्णा रंगनाथ राऊत (वय ४०, रा. रमाईनगर, हर्सुल) यानी दिलेल्या तक्रारीनुसार, अण्णा रंगनाथ राऊत हे भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांचा मुलगा अनिकेत हा गेल्या सात ते आठ महिन्यांपासून एका खाजगी हॉस्पीटलमध्ये नोकरी करत होता. २ जानेवारी रोजी अण्णा राऊत यांच्या मोबाईलवर कॉल आला. त्यांचा मुलगा अनिकेत हा जखमी अवस्थेत मकई गेट येथे पडलेला आहे. तुम्ही दवाखान्यात या, असे सांगितले. रुग्णालयात आल्यानंतर अण्णा राऊत यांनी त्यांच्या मुलाला पाहिले असता, त्याला मारहाण झाली होती. खांद्यावर मागे डाव्या बाजुला टाके होते. तसेच डावा पाय गुडघ्याच्या खाली फ्रॅक्चर होता.या मारहाणीबाबत जखमी अनिकेत राऊत याला विचारणा केली असता, तो घाबरलेला होता. त्याने दोन जणांनी त्याला बुलेटवर घेऊन गेले होते, असे सांगितले. दरम्यान, अनिकेत हा घाबरलेला होता. म्हणून त्याचे वडील अण्णा राऊत यांनी जास्त विचारपूस केली नाही. दरम्यान



२ जानेवारीला रात्री ८ वाजेच्या दरम्यान हर्सुल पोलीस आल्यानंतर, पोलिसांनी जखमी अनिकेतशी बोलल्यानंतर अनिकेतने घटनेची माहिती पोलिसांना दिली.जखमी अनिकेत याने सांगितले कि, २ जानेवारी रोजी सकाळी ६.३० वाजेच्या दरम्यान तो घरातून कामावर जाण्यासाठी पायी निघाला. तो रिक्षाची वाट पाहत उभा असताना, एका काळ्या रंगाच्या बुलेट आणि एका दुचाकीवर चार जण आले. त्यांनी दुचाकीवर अनिकेत याला जबरदस्तीने बसवून भिमटेकीकडे निघाले. हमारे आंटी को छेडता है क्या असे सांगत भैय्या नावाच्या व्यक्तीने लोखंडी रॉडने अनिकेतच्या डाव्या पायावर मारले. तसेच इतर तिघांनी चाकुने तसेच हाताचापटाने मारहाण केली. असा जबाब मयत अनिकेत याने हर्सुल पोलिसांकडे नोंदविला. दरम्यान, पोलिसांनी जबाब नोंदविल्यानंतर अण्णा राऊत आणि पोलिसांनी डिकेएमएम कॉलेज जवळील सीसीटीव्हीची पाहणी केली असता, अनिकेत याला दोन जण एका दुचाकीवर शर्ट आणि बनियान नसलेल्या अवस्थेत मकाई गेटकडे घेऊन जात होते.अनिकेत याला मारहाण करणाऱ्यांची माहिती विचारले असता, त्याने मारेकऱ्यांपैकी चार जणांपैकी एकाला भैय्या म्हणुन ओळखत असल्याचे सांगितले. दरम्यान, हर्सुल पोलिसांनी अधिक विश्वासात घेतले असता, त्याने त्याच्या मोबाईलमध्ये इन्स्टांग्राम उघडून दोघांचा फोटो दाखविला. या फोटोत मारेकऱ्यांपैकी संकेत गायकवाड असे नाव होते.प्रकरणात घाटी हॉस्पीटलमध्ये उपचार चालू असताना ७ जानेवारी रोजी १.२५ वाजेच्या दरम्यान अनिकेत राऊत याचा मृत्यू झाला. या प्रकरणात

## मुलांसोबत अखेरचा सेल्फी काढला अन पोलिसाच्या पत्नीने आयुष्य संपवलं

**सोलापूर :** सोलापूर शहरात एक धक्कादायक घटना घडली आहे. न्यू संतोष नगर पोलिस लाईन येथे राहणाऱ्या पोलिस पत्नीने गळफास घेऊन आपल्या आयुष्याची अखेर केली आहे. ही घटना बुधवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास उघडकीस आल्याची माहिती आहे. अश्विनी सिलसिद्ध सलगर असं गळफास घेऊन जीवन संपवलेल्या महिलेचे नाव आहे. अश्विनीने दोन्ही मुलं झोपलेली असताना त्यांच्यासोबत सेल्फी फोटो काढला आणि जवळच राहत असलेल्या नातेवाईकाला अश्विनीने फोन करून जीव देत असल्याची माहिती दिली.अश्विनी नेहमीच अशा धमक्या देत होती, म्हणून नातेवाईकांनी त्याकडे दुर्लक्ष केलं. मध्यरात्री जीव देत असल्याचा मेसेज अश्विनीने नातेवाईकाला पाठवला होता. अश्विनीने यावेळी धमकी न देता खरंच साडीच्या साह्याने सिलिंगच्या लोखंडी अँगलला गळफास घेतला होता. अश्विनीला बेशुद्ध अवस्थेत खाली उतरवून उपचारासाठी सोलापुरातील शासकीय सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, सोलापूर शहरातील विजापूर नाका पोलिस ठाणे येथे कार्यरत असलेले सिलसिद्ध यांची पोलिस ठाण्यात नाईट ड्युटी असल्याने पोलिस ठाण्यात गेले होते. घरामध्ये पत्नी अश्विनी आणि दोन मुलं होती. मध्यरात्री अश्विनीने दोन्ही मुलं झोपलेली असताना त्यांच्यासोबत सेल्फी फोटो काढला आणि जवळच राहत असलेल्या नातेवाईकाला अश्विनीने फोन करून जीव देत असल्याची माहिती दिली. अश्विनी ही अशी धमकी नेहमीच देत होती म्हणून नातेवाईकांनी त्याकडे दुर्लक्ष केलं. मध्यरात्री अश्विनीने नातेवाईकाला मेसेज पाठवला होता.अश्विनीच्या नातेवाईकांनी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास हा मेसेज पाहिला आणि त्याच्या पतीला माहिती दिली.

## नाशिकमध्ये २४ लाखांचे ड्रग्ज जप्त ; तिघे अटकेत..

**नाशिक :** शहरासह जिल्ह्यात मॅफड्रोन (एमडी) व गांजाची तस्करी सुरू असताना आता थेट लष्कराच्या तळापर्यंत नशेचा बाजार सुरू झाल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. शहर पोलिसांच्या पथकांनी लष्करी छावणीच्या प्रवेशद्वारासमोर असलेल्या कॅथे कॉलनीत टाकलेल्या छाप्यात 'ॲम्फेटामाइन' नावाचा चोवीस लाखांचा अमली पदार्थ जप्त केले आहेत. त्याप्रकरणी तिघांना अटक केली असून, न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावली आहे. त्यांनी लष्करात ड्रग्जचा पुरवठा केल्याचा संशय असून पुढील तपास सुरू आहे. देवळाली कॅम्प पोलिस ठाण्यातील अंमलदार राजेंद्र गुंजाळ यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मुन्ना कल्लु कोल (वय ४०), शांती मुन्ना कोल (३३), अमर मुन्ना कोल (१९, सर्व रा. सतना, मध्यप्रदेश) अशी संशयितांची नावे आहेत. हे सर्वजण मजूर असून काही महिन्यांपासून देवळाली कॅम्प पोलिस ांच्या हद्दीत वास्तव्यास आहेत. गुरुवारी (दि. ८) पहाटे पाच वाजेच्या सुमारास देवळाली कॅम्प पोलिस व अमली पदार्थ विरोधी पथकाने (एनडीपीएस) छापा टाकला. त्यावेळी कोल याच्या लेबर रूममध्ये गांजा आणि 'ॲम्फेटामाइन' या अमली पदार्थांचा साठा आढळून आला. त्यांनी पांढऱ्या रंगाच्या चौकोनी आकारातील कागदात 'ॲम्फेटामाइन' हा पदार्थ गुंढाळून ठेवला होता. देवळाली कॅम्पचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीनिवास देशमुख यांच्या पथकासह 'एनडीपीएस'ने ही कारवाई केली आहे.लष्करी छावणीच्या प्रवेशद्वारासमोरच अमली पदार्थांच्या साठा आढळल्याने खळबळ उडाली आहे. हे अमली पदार्थ लष्करी छावणी परिसरातील



काही जवानांपर्यंत पोहोचल्याचे समोर येत आहे. लष्करातील व्यक्तिंना हे पदार्थ पोहोचल्याचे समजल्यानंतर सैन्यातील काही अधिकाऱ्यांनी पोलिसांना त्यासंदर्भात कळवले.

त्यानुसार पोलिसांनी परिसरात गोपनीय माहिती संकलित करुन संशयितांभोवती सापळा रचून ही कारवाई केली. या नशेच्या बाजारातून अद्याप कोणताही गंभीर स्वरुपाचा प्रकार लष्करात घडला नसल्याचे कळते. मात्र, लष्करी यंत्रणांपर्यंत नशेचा विळखा पोहोचल्याने यंत्रणादेखील सतर्क झाल्या आहेत.ॲम्फेटामाइन' हे उत्तेजक औषध किंवा उत्तेजक द्रवपदार्थ म्हणून ओळखला जातो. त्याचा मध्यवर्ती मज्जासंस्थेवर परिणाम होऊन सतर्कता आणि ऊर्जा वाढवते. मात्र, त्याच्या गैरवापरामुळे व्यसन आणि गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात.

## नदीवर गेले, तृतीयपंथी पत्नीने बॉयफ्रेंडलाच दिली पतीची सुपारी

**पाटणा :** पोलिसांनी एका भीषण हत्याकांडाचा पर्दाफाश केला आहे. बिहारमधील लक्षिसराय जिल्ह्यातील किउल पोलिस स्टेशन परिसरात घडलेल्या विनोद साहची हत्या त्याचीच तृतीयपंथी पत्नी गुंजाने केल्याचं समोर आलं आहे. तिच या हत्येची सूत्रधार असल्याचं निष्पन्न झालं आहे. पोलिस तपासात असंही समोर आलं आहे की, तृतीयपंथी गुंजाने प्रियकरासह तिच्या पतीच्या हत्येचा कट रचला होता. हत्येसाठी एक लाख रुपयांची सुपारी करार दिला होता.घटना २४ डिसेंबर २०२५ च्या संध्याकाळी घडल्याची माहिती आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विनोद साह याला त्याची पत्नी गुंजाने बहाण्याने घराबाहेर नेलं आणि मग त्याला किउल नदीजवळ घेऊन



गेली. तिचा प्रियकर संतोष कुमार आणि त्याचे तीन साथीदार राज नारायण, मोहम्मद आफताब आणि अजित कुमार हे आधीच तिथे यांची वाट पाहत होते. विनोद साह घटनास्थळी पोहोचताच आरोपीने ब्लेडने त्याचा गळा चिरला, ज्यामध्ये तो गंभीर जखमी झाला. त्यानंतर त्याला रक्ताच्या थारोळ्यात टाकून आरोपी तिथून पळून गेले.घटना तेव्हा समोर आली जेव्हा, कुटुंबाने विनोद साह हा बेपत्ता होण्याची तक्रार किउल पोलीस ठाण्यात दाखल केली. पोलिसांनी तक्रार नोंदवली आणि तात्काळ कारवाई केली. यावेळी त्याच रात्री उशिरा पोलिसांच्या गस्ती पथकाला किउल नदीजवळ विनोद साह गंभीर अवस्थेत आढळून आला. पोलिसांनी त्याला तात्काळ सदर रुग्णालयात दाखल केले, परंतु उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.घटनेनंतर गुंजाने स्वतः वृंदावन गावातील दोन पुरुषांविरुद्ध किउल पोलिस ठाण्यात तक्रार केली की त्यांनीच विनोदची हत्या केली. यामुळे पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, पोलिसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी केली. तेव्हा याबाबत अनेक धक्कादायक माहिती समोर आली.पोलिसांना विनोदची पत्नी गुंजा हिच्याबाबत काही गोष्टी कळाल्या. गुंजाचं काजरा येथील संतोष कुमारसोबत गेल्या बऱ्याच काळापासून प्रेमसंबंध होते. या दोघांनी लखीसराय न्यायालयात लग्नही केलं होतं. पण, त्यांच्या या प्रेमप्रकरणात विनोद हा अडसर ठरत होता. त्याच्या मार्गातून हटवण्यासाठी यांनी त्याच्या हत्येचा कट रचला. त्यासाठी गुंजाने संतोषलाच एक लाखाची सुपारी दिली होती.

त्यानंतर पोलिसांनी चौकशीसाठी गुंजाला ताब्यात घेतलं. पोलिसी खाक्या दाखवताच तिने आपला गुन्हा कबुल केला. याप्रकरणी पोलिसांनी गुंजा, संतोष कुमार आणि तीन साथीदारांनी अटक केली आहे. सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत. याप्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

# मुंबई आणि आरसीबी एकमेकांना भिडणार




**मुंबई :** महिला प्रीमियर लीग २०२६ आजपासून नवी मुंबईत सुरू होत आहे. स्पर्धेतील पहिला सामना गतविजेत्या मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळूर (आरसीबी) यांच्यात डॉ. डी. वाय. पाटील स्पोर्ट्स अकादमी येथे खेळला जाईल. मुंबई इंडियन्सचे नेतृत्व हरमनप्रीत कौर करत आहे, तर आरसीबीची कमान भारतीय महिला संघाची स्टार फलंदाज स्मृती मंधाना सांभाळणार आहे. हा सामना संध्याकाळी ७:३० वाजता सुरू होईल, तर नाणेफेक ७ वाजता होईल.मुंबई इंडियन्स महिला प्रीमियर लीगच्या इतिहासातील सर्वात यशस्वी संघ आहे. त्यांनी स्पर्धेतील तीनपैकी दोन विजेतेपदं पटकावली आहेत. आरसीबीनेही एकदा विजेतेपद मिळवले आहे. त्यामुळे या दोन्ही संघांमधील लढत अत्यंत चुरशीची होण्याची अपेक्षा आहे. महिला प्रीमियर लीगमध्ये आतापर्यंत या दोन्ही संघांम ध्ये एकूण ७ सामने झाले आहेत. यापैकी मुंबई इंडियन्सने ४ सामने जिंकले आहेत, तर आरसीबीने ३ सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे.आरसीबीसाठी एक मोठा धक्का बसला आहे. ऑस्ट्रेलियाची एलिस पेरी, जी महिला क्रिकेट इतिहासातील सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडूंपैकी एक मानली जाते, ती या हंगामातून बाहेर पडली आहे. पेरी लीगमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि तिने १४ बळीही घेतले आहेत. मुंबईविरुद्ध २०२४ च्या हंगामात पेरीने १५ धावा देऊन ६ बळी घेतले होते, जो या स्पर्धेतील कोणत्याही गोलंदाजाचा सर्वोत्तम कामगिरीचा विक्रम आहे.रॉयल चॅलेंजर्स बंगळूर संघाची संभाव्य संघात स्मृती मंधाना (कर्णधार), जॉर्जिया वोल, गौतमी नाईक, ग्रेस हॅरिस, ऋचा घोष (यष्टीरक्षक), नादिन डी क्लार्क, पूजा वस्त्रकार, राधा यादव, श्रेयंका पाटील, अरुंधती रेड्डी, लॉरेन बेल, कुमार प्रथ्योशा, सयाली सतघरे, प्रेमा रावत, दयालन हेमलता, लिन्से स्मिथ यांचा समावेश आहे.मुंबई इंडियन्स संघाची संभाव्य संघात हेली मैथ्यूज, जी. कमालिनी (यष्टीरक्षक), नेट सायव्हर-ब्रंट, हरमनप्रीत कौर (कर्णधार), अमेलिया केर, अमनजोत कौर, सजीवन सजना, पूनम खेमनार, संस्कृती गुप्ता, शबनीम इस्माइल, त्रिवेणी वशिष्ठ, नल्ला रेड्डी, राहिला फिरदौस, मिल्ली इलिंगवर्थ, सैका इशाक, निकोला केरी यांचा समावेश आहे.

## बॅटींगनंतर खेळाडूचा जागेवरच मृत्यू, बोर्डाचा मोठा निर्णय..

**मुंबई :** मिझोरमचे माजी रणजी क्रिकेटपटू के. लालरेमरूता यांचे एका स्थानिक क्रिकेट सामन्यादरम्यान मैदानावर कोसळल्यानंतर निधन झाले. या दुर्दैवी घटनेमुळे राज्य क्रिकेट विश्वात शोककळा पसरली असून, आदरांजली म्हणून सर्व नियोजित सामने रद्द करण्यात आले आहेत. ही घटना खालेद मेमोरियल सेकंड डिव्हिजन स्क्रीनिंग टूर्नामेंट अंतर्गत वेंघनुई रेडर्स सीसी आणि चाउनपुई आयएलएमओवी सीसी यांच्यात खेळल्या जात असलेल्या साम न्यादरम्यान घडली. वेंघनुई रेडर्स सीसीचे प्रतिनिधित्व करणारे ३८ वर्षीय लालरेम रूता यांना सामन्यादरम्यान अचानक वैद्यकीय मेडिकल इमर्जन्सीचा सामना करावा लागला. त्यांना तातडीने प्रथम ोपचार देण्यात आले आणि उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले, परंतु डॉक्टरांना त्यांना वाचवता आले नाही. लालरेमरूता हे मिझोरमचे प्रतिनिधित्व करणारे माजी रणजी ट्रॉफी क्रिकेटपटू होते. खेळातून निवृत्ती घेतल्यानंतरही ते क्रिकेटशी सक्रियपणे जोडलेले होते. ते सीनियर टूर्नामेंट समितीचे सदस्य होते आणि राज्यात क्रिकेटच्या विकासासाठी त्यांचे निस्वार्थ योगदान सर्वत्र कौतुकास्पद होते. अधिकारी आणि सहकारी क्रिकेटपटूंनुसार, ते पडद्यामागे राहून स्पर्धांच्या सुरळीत संचालनासाठी आणि तळागाळातील क्रिकेटला पुढे नेण्यासाठी अथक परिश्रम करायचे.अकाली निधनानंतर मिझोरम क्रिकेट असोसिएशनने गुरुवारी होणारे सर्व क्रिकेट सामने रद्द करण्याची घोषणा केली. यामध्ये एससीजी, सिह्मुई येथे सुरू असलेल्या सेकंड डिव्हिजन स्क्रीनिंग टूर्नामेंटचे सामने, लाविपुई प्लेग्राउंड येथे होणारे थर्ड डिव्हिजन स्क्रीनिंग टूर्नामेंटचे उपांत्य फेरीचे सामने आणि मुआलपुई येथील पीयूसी ग्राउंड व एमपीसी ग्राउंडवर आयोजित होणाऱ्या समग्र आंतरशालेय क्रिकेट स्पर्धा (मुले आणि मुली) यांचा समावेश आहे. प्रभावित सर्व सामन्यांचे आयोजन सुधारित वेळापत्रकानुसार पुन्हा केले जाईल, असे असोसिएशनने म्हटले आहे.मिझोरम क्रिकेट असोसिएशनने एका अधिकृत निवेदनात लालरेमरूता यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आणि राज्य क्रिकेटमधील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाला अधोरेखित केले.

## भारताला टी २० मालिकेपूर्वी मोठा धक्का, मॅच विनर खेळाडू संघाबाहेर, गंभीर यांची चिंता वाढली..




**दिल्ली :** भारतीय संघाला आता एक मोठा धक्का बसला आहे. कारण न्यूझीलंडविरुद्धची टी २० मालिका सुरु होण्यापूर्वीच भारताचा स्टार खेळाडू आता संघामधून आऊट झाला आहे. त्यामुळे गौतम गंभीर आणि सूर्यकुमार यादव यांची चिंता नक्कीच वाढलेली असेल.

भारताने टी २० सामन्यांमध्ये आतापर्यंत दमदार कामगिरी केली आहे. सूर्यकुमार यादवने भारताचे दमदार नेतृत्व केले आहे. पण भारताच्या विजयात म ोलाचा वाटा उचलणारा स्टार खेळाडू मात्र आता संघाबाहेर गेला आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील टी २० मालिका आता फक्त काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. या मालिकेत पाच टी २० सामने खेळवले जाणार आहेत. पण या मालिकेमध्ये आता भारताचा स्टार खेळाडू असणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.टी २० वर्ल्ड कपही आता काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे भारताच्या टी २० संघात असलेल्या खेळाडूंना गौतम गंभीर विश्रांती देत आहेत. जसप्रीत बुमराह, हार्दिक पंड्यासारख्या मोठ्या खेळाडूंना त्यांनी वनडे मालिकेत त्यासाठीच संधी दिली नाही. कारण टी २० वर्ल्ड कपम ध्ये हे सर्व खेळाडू ताजेतवाने असायला हवेत. पण हे सर्व प्लॅनिंग करत असताना मात्र गौतम गंभीर यांची चिंता चांगलीच वाढलेली आहे. कारण संघातील धडाकेबाज खेळाडू आता थेट संघाबाहेर जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. काही दिवसांपूर्वी भारताचा स्टार खेळाडू तिलक वर्माच्या पोटात अचानक दुखायला लागलं होतं. ही दुखापत एवढी गंभीर होती की, त्याच्यावर आता थेट शस्त्रक्रीया करावी लागणार आहे. त्यामुळे आता तिलक वर्मा हा टी २० सामन्यात खेळणार की नाही, याबाबतचे अपडेट्स बीसीसीआयने दिले आहेत. बीसीसीआयने म्हटले आहे की, तिलक वर्मा हा भारताच्या टी २० मालिकेतील पहिले तीन सामने खेळू शकणार नाही, त्यानंतर पुन्हा त्याची फिटनेस टेस्ट होईल आणि त्यानंतरच त्याला संघात स्थान देण्यात येईल. पण तिलक वर्माची दुखापत पाहता तो संपूर्ण मालिकेलाच मुकणार असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे.

# सर्फराझ खानने काढल्या फक्त १५ चेंडूंत ५० धावा

### सामन्यात किती रन्सचा पाऊस पाडला..

जयपूर : सर्फराझ खानची तुफानी फटकेबाजी पाहण्याचा योग चाहत्यांना गुरुवारी आला. सर्फराझ खानने फक्त १५ चेंडूंत यावेळी आपले अर्धशतक पूर्ण केले. त्यामुळे मुंबईच्या संघाला यावेळी दमदार धावसंख्या उभारता आली.

मुंबईच्या संघाची ३ बाद २५ अशी अदयनीय अवस्था झाली होती. त्यावेळी सर्फराझ खान खेळायला आला. मुंबईच्या धावांची मरगळ यावेळी सर्फराझ खानने झटून टाकली आणि पंजाबच्या गोलंदाजीवर जोरदार प्रहार करायला सुरुवात केली. सर्फराझने सुरुवातीपासूनच मोठे फटके मारायला सुरुवात करताना कसलीही तमा बाळगली नाही. सर्फराझ खानने पहिल्याच चेंडूवर आपले इरादे स्पष्ट केले होते.सर्फराझ खानने पंजाबच्या अभिषेक शम ोला आपल्यापुढे लोटांगण घालण्यास भाग पाडले. अभिषेक शर्मा यावेळी मुंबईच्या फलंदाजांना लवकर बाद करण्यासाठी गोलंदाजी करायला आला होता. पण त्याला त्याचे हे षटक चांगलेच भारी पडले.




कारण या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर सर्फराझने षटकार लगावला. त्यानंतर दुसऱ्या चेंडूवर चौकार, तिसऱ्या चेंडूवर पुन्हा षटकार, चौथ्या चेंडूवर चौकार, पाचव्या चेंडूवर तिसरा षटकार आणि सहाव्या चेंडूवर चौकार लगावत या एकाच षटकात तब्बल ३० धावा वसूल केल्या.सर्फराझ खानने या सामन्यात आपले अर्धशतक फक्त १५ चेंडूंत पूर्ण केले आणि त्यानंतर तो शतकाच्या दिशेने कूच करायला लागला. सर्फराझने आपली धडाकेबाज फलंदाजी कायमच ठेवली. सर्फराझ यावेळी २० चेंडू खेळू शकला. या २० चेंडूंत सर्फराझने ६२ धावांची खेळी साकारली आणि संघाला विजयाची आशा दाखवली. कारण पंजाबच्या संघाला मुंबईने २१६ धावांत ऑल आऊट केले होते. मुंबईच्या संघाला जिंकण्यासाठी २१७ धावांची गरज होती, त्यामधील ६२ धावा या फक्त सर्फराझ खाननेच केल्या होत्या. त्यामुळे मुंबईच्या संघाला सर्फराझ खानने विजयाचा मार्ग सुकर करून दिला होता.सर्फराझ खानने धमाकेदार फटकेबाजी करत या सामन्यात आपली छाप पाडली. सर्फराझने २० चेंडूंतच पंजाबच्या गोलंदाजांचे तोंडचे पाणी पळवले होते.

# त्यांनी स्वत:च्या पायावर दगड मारून घेतलाय..

## शो सोडलेल्या कलाकारांबद्दल अब्दुलचं वक्तव्य चर्चेत

**मुंबई :** तारक मेहता का उल्टा चष्मा ' ही मालिका अनेक वर्षांपासून प्रेक्षकांचं मनोरंजन करतेय. १७ वर्ष हा कार्यक्रम सुरू असून या कार्यक्रमातील सीन्स सोशल मीडियावर व्हायरल होतात. या मालिकेतील अनेक कलाकारांनी एक्झिटही घेतली. त्याचबरोबर मालिकेचे निर्माते असित मोदी यांच्यावर अनेक आरोपही करण्यात आले. अशातच आता मालिकेमध्ये अब्दुलची भूमिका साकारणारे अभिनेते शरद संकलाने मालिकेबद्दल भाष्य केलं आहे. त्याचबरोबर त्यांनी 'तारक मेहता का उल्टा चश्मा' ही मालिका सोडून गेलेल्या कलाकारांबद्दलही सांगितलं आहे.तारक मेहता...' ही मालिका ज्या





कलाकारांनी सोडली त्यापैकी काहींनी असं म्हटलं की असित मोदींनी त्यांना पैसे दिले नाहीत. अशातच आता 'आवारा मुसाफिर' या पॉडकास्टला दिलेल्या मुलाखतीमध्ये अब्दुल म्हणजेच शरद संकला म्हणाले की, 'जे गेलेत ते पुन्हा येण्याचा प्रयत्न करत आहेत, पण त्यांना पुन्हा ती संधी मिळत नाहीये. याबद्दल तर मी म्हणेन की, त्यांनीच स्वतःच्या पायावर दगड मारून घेतला आहे, त्यामुळे यामध्ये असित मोदींची काही चूक नाही'दुसरी गोष्ट, जे लोक पैसे नाही मिळाले असं म्हणत आहेत तर त्यांच्याबद्दल मी म्हणेन की, ते लोक त्यांच्या इच्छेनुसार गेले. मग निर्मात्यांचंही नुकसान झालंच ना! मग ते त्यांच्या हिशोबाने देणार, दिलेही असतील.

या खरंतर त्यांच्या खासगी गोष्टी आहेत. त्यांचा काय करार झाला असेल हे त्यांनाच माहीत.' असं शरद यांनी पुढे सांगितलं.पुढे, शो सोडून गेलेल्या कलाकारांबद्दल शरद म्हणाले, 'मी हे प्रेक्षक म्हणून सांगतो की, जे शो सोडून गेले आहेत ते 'तारक मेहता का उल्टा चश्मा'नंतर कुठेही दिसत नाहीये. ते 'तारक मेहता का उल्टा चश्मा'मध्ये काम करत नाहीयेत, पण इतरही कलाकृतींमध्ये दिसत नाहीयेत.'दरम्यान, 'तारक मेहता का उल्टा चष्मा' या मालिकेबद्दल सांगायचं तर, या मालिकेतून पलक सिद्धवानी, शैलेश लोढा, राज अनादकट, नेहा मेहता, कुश शाह, भव्य गांधी, दिशा वकाणी, जेनिफर मिस्त्री बन्सीवाल यांसारख्या कलाकारांनी एक्झिट घेतली आहे.


## श्रद्धा केतकर करतेय टीटनसचा सामना

**मुंबई :** स्टार प्रवाह वाहिनीवरील ' ठरलं तर मग ' ही मालिका आघाडीवर असून त्यातील प्रत्येक कलाकारही चर्चेत असतात. 'ठरलं तर मग' फेम अभिनेत्री १७ वर्षांपासून एका आजाराचा सामना करतेय. याबद्दल स्वतः तिनं नुकत्याच एका मुलाखतीमध्ये सांगितलं आहे.ठरलं तर मग' मालिकेत सुमनची भूमिका श्रद्धा केतकर-वर्तकने साकारली आहे. श्रद्धा १७ वर्षांपासून एका आजाराचा सामना करते. याबद्दल सांगताना श्रद्धा केतकर म्हणाली की, 'मी, नाटक करत होते, 'एक डाव भटाचा' ते करत असताना अचानक मला सर्दी झाली आणि तेव्हा माझ्या कानामध्ये आवाज सुरू झाले. म्हणजे, पूर्वीच्या काळी कुकर असायचे ना वाफेचे, त्या कुकरची शिटी जेवढ्या मोठ्याने वाजते, तसे शिटीचे आवाज माझ्या कानात सुरू झाले. मला वाटलं की ही सर्दी आहे, बरी झाल्यावर जाईल. पण ते काही गेले नाहीत आणि या गोष्टीला १७ वर्ष झाली असतील. तेव्हा ते जे आवाज सुरू झाले, ते आजपर्यंत आहेत. तेव्हा प्रचंड त्रास होत होता आणि आता त्याची सवय मी करून घेतली. कारण, त्याच्यावर उपाय काही नाही.'त्याला 'Tinnitus' नावाचा आजार म्हणतात. तर ती शिटी काही जात नाहीये आणि त्याचा परिणाम माझ्या ऐकण्याच्या क्षमतेवर झाला. जोपर्यंत तरुण वय होतं, तो पर्यंत चालून गेलं. पण, नंतर नंतर मला ऐकू येत नव्हतं आणि मला कळायचं नाही. एक क्षण असा आला की, माझा आत्मविश्वासच गेला. 'सरस्वती' नंतर खूप त्रास झाला. म्हणून मी थांबण्याचा निर्णय घेतला.' असं FM KMW 29 या युट्युब चॅनलला दिलेल्या मुलाखतीमध्ये श्रद्धाने सांगितलं.ह्यातून बाहेर कशी पडली? असं विचारलं असता श्रद्धा म्हणाली की, 'माझा नवरा मला म्हणाला, तू श्रवणयंत्र वापर आणि मग मी विचार करून ते घेण्याचा निर्णय घेतला. छोट्यातलं छोटं श्रवणयंत्र घेतलं. मग आम्ही कस्टमाइज मशीन बनवून घेतलं. आताही मला ते मशीन वापरुन काम करावं लागतं. त्यामुळे मला नीट ऐकू येतं. पण माझ्या कानात येणारे आवाज आजही सुरूच आहेत.'

## Bigg Boss Marathi 6 बद्दल अभिजीत सावंतचं वक्तव्य चर्चेत

**मुंबई :** अभिजीत सावंत टॉप २ मध्ये पोहोचलेला आणि या पर्वाचा उपविजेता झालेला. आता बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वाची उत्सुकता सर्वांना लागली आहे. या पर्वामध्ये कोणते कलाकार सहभागी होणार, याकडे सर्वांचं लक्ष वेधलं आहे. नुकतीच बिग बॉस मराठीच्या माजी स्पर्धकांची पार्टी आयोजित केलेली. स्मिता गोंदकरने ही पार्टी आयोजित केलेली. अशातच आता अभिजीत सावंतने सहाव्या सीझनवर प्रतिक्रिया दिली आहे.इट्स मज्जा'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये अभिजीत सावंतला 'बिग बॉस मराठी'बद्दल विचारण्यात आलं. त्यावर अभिजीत सावंत म्हणाला की, 'आता सगळ्यांना भेटून खूप मजा आली. बिग बॉस करण्याच्या आधी खूप अभ्यास करावा लागतो असं म्हणतात. तसा मीही केला होता. आधीचे सीझन पाहिले होते. ते कसे खेळतात, त्यांचे गेम प्लॅन कसे असतात हे पाहिलं होतं. आज त्या सगळ्यांना भेटून त्यांचे आभारच मानले. शिव ठाकरे माझा आवडीचा होता. मी जास्त शिवचेच एपिसोड पाहिले होते. तो खूप व्यवस्थित राहिला, तोल सांभाळून होता आणि त्याने शो जिंकूनही दाखवला. तो नक्कीच माझ्यासाठी प्रेरणादायी होता.

## घाटात १४ वाहनं धडकली, अभिनेत्रीनं ओढले ताशेरे





### म्हणाली, 'हात झटकू नये..'

**मुंबई :** ठाणे-घोडबंदर रोडवरील गायमुख घाटात आज, ९ जानेवारी रोजी सकाळी एका भीषण अपघातात तब्बल १४ वाहने एकमेकांवर आदळली. या अपघातामुळे रस्त्याची दुरवस्था, कायमस्वरूपी ट्रॅफिक आणि वाहतूक पोलिसांची अनुपस्थिती यांसारख्या समस्या पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत. मराठी अभिनेत्री ऋतुजा बागवेनं या अपघाताचा व्हिडिओ शेअर करत सरकारवर टीका केली आहे.शुक्रवारी सकाळी घडलेल्या या अपघातात १४ वाहने एकमेकांना धडकली. यामुळे ठाणे-घोडबंदर मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली. या अपघाताची भीषणता शेअर केलेल्या व्हिडिओतून दिसून येत आहे. घोडबंदरहून ठाण्याच्या दिशेने अवजड वाहने जात असताना काही हलकी वाहने विरुद्ध दिशेने येत होती. नियंत्रण सुटल्यानं ही वाहने एकमेकांना आदळली. मात्र, अभिनेत्री ऋतुजा बागवेने या अपघाताचे खरे कारण रस्त्याची दुरवस्था असल्याचं म्हटलं आहे.ऋतुजा बागवेनं इन्स्टाग्राम स्टोरीवर अपघाताचा व्हिडिओ शेअर केला. हा व्हिडिओ शेअर करत अभिनेत्रीनं म्हटलं की, 'विरुद्ध दिशेला गाडी टाकल्यामुळे अपघात झाला, असं म्हणून सरकारने कृपया हात झटकू नये.' तिनं पुढे अपघाताचं खरं कारण 'रस्त्याची दुरवस्था', 'कायम ट्रॅफिक' आणि 'ट्रॅफिक पोलिस नसणं', तसंच 'सरकारचं दुर्लक्ष' असल्याचं म्हटलं आहे.अपघातात अनेकजण जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच पोलीस, वाहतूक शाखा आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाची पथके घटनास्थळी दाखल झाली. चार जखमींना ठाण्यातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघातामुळे गायमुख ते वसई खाडी पूलापर्यंत वाहतूक कोंडी झाली आहे. अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला करण्याचं काम पथकांकडून सुरू असून रस्त्यावर वाहनांच्या काचा आणि तुटलेले भाग पडले आहेत. पोलिसांनी नागरिकांना या मार्गावरील प्रवास टाळण्याचं आवाहन केलं आहे. त्यामुळे ठाणे-घोडबंदर रोडची दुरवस्था ही सामान्य नागरिकांसाठी चिंतेचा विषय बनली आहेदरम्यान, ऋतुजा बागवेच्या कामाबद्दल सांगायचं तर अभिनेत्रीनं अनेक मराठी आणि हिंदी मालिकांमध्ये काम केलं आहे. त्याचबरोबर अभिनेत्री सोशल मीडियावरही कायम सक्रीय असते.

# बुलढाण्यात रविवारी संत निरंकारी मंडळाच्यावतीने रक्तदान शिबिर...

## मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशन अंतर्गत येत्या रविवारी, ११ जानेवारीला रक्तदान शिबिर आणि आध्यात्मिक सत्संग सोहळ्याचे आयोजन येथील क्रीडा संकुल रोडवरील पांडुरंग लॉन्स येथे करण्यात आले आहे. या शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. संत निरंकारी मिशन ही एक आध्यात्मिक विचारधारा आहे. जगभरात निरंकारी मिशनद्वारे चॅरिटेबल फाऊंडेशन अंतर्गत रक्तदान शिबिर, वृक्ष लागवड तसेच स्वच्छता अभियान यासारखे उपक्रम राबविले जातात. रक्त संकलनात जगातील अग्रस्थानी असलेल्या संस्थांपैकी एक निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनची ओळख आहे. मानवतेचे कल्याण हे परमध्येय माणून तयानुसार निरंकारी मंडळाचे कार्य सुरू आहे. मिशनच्या विद्यमान प्रमुख




सद्गुरू माता सुदिक्षा सविंदर हरदेवजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली होणारा आध्यात्मिक सत्संग मानवी जीवनाच्या उद्धाराचा मार्ग ठरला आहे. बुलढाणा शहरातही निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशन द्वारा रविवारी क्रीडा संकुल रोडवरील पांडुरंग लॉन येथे सकाळी ९ ते दुपारी ३ यावेळेत रक्तदान शिबिर पार पडेल. प्रमुख उपस्थितीत संत निरंकारी मिशनचे बुलढाणा जिल्हा संयोजक शालीग्राम चवरे, प्रचारक नारायण चव्हाण हे असतील. यानंतर, सायंकाळी ६ ते ९ यावेळेत नारायण चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत आध्यात्मिक सत्संग सोहळा होणार आहे. या दोन्ही कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन मंडळाचे बुलढाणा मुखी हनुमान भोसले, सेवादल शिक्षक सुभाष राजपूत यांनी केले आहे.

# ई-पीक पाहणीची नोंदणी २४ जानेवारीपर्यंत करा; जिल्हाधिकाऱ्यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

शासनाच्या महत्त्वाकांक्षी रब्बी हंगाम ई-पीक पाहणी (डिजिटल क्रॉप सर्वे-) उपक्रमाची सुरुवात दि. १० डिसेंबर २०२५ पासून झाली असून शेतकऱ्यांनी आपल्या ७/१२ वर पीक पेरा स्वतः अँड्रॉईड मोबाईलद्वारे नोंदविणे आवश्यक आहे. शेतकरी स्तरावर पीक पाहणी करण्याची अंतिम मुदत दि. २४ जानेवारी २०२६ असून सर्व शेतकरी बांधवांनी वेळेत नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. रब्बी हंगाम २०२५ च्या ई-पीक पाहणी ( ) अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात आजपर्यंत ८९ हजार ३४०.७५ हेक्टर क्षेत्रावर तसेच एकूण ७ लाख ९९ हजार १९५ पिक पाहणी करावयाच्या ओनर प्लॉटपैकी (म ) ८० हजार ०२८ प्लॉटवर संबंधित शेतकऱ्यांनी व्हर्जन ४.०.५ या मोबाईल ॲपद्वारे आपल्या ७/१२ वर पीक नोंदणी केली आहे. सध्या जिल्ह्यात ई-पीक पाहणीची नोंदणी ३९.३२ टक्के क्षेत्रावर पूर्ण झाली असून उर्वरित क्षेत्रावर सर्व शेतकऱ्यांनी तात्काळ नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ई-पीक पाहणीसाठी व्हर्जन ४.०.५ हे ॲप अँड्रॉईड फोनवर आवश्यक असून गुगल क्रोम अपडेट करून मोबाईलमध्ये इन्स्टॉल करावे. शेत बांधावर जाऊन पीकांची नोंदणी करून माहिती अपलोड करणे अपेक्षित आहे. शेतकऱ्याकडे मोबाईल उपलब्ध नसल्यास किंवा ॲप हाताळण्यात अडचण येत असल्यास संबंधित गावचे तलाठी, कोतवाल तसेच साठी नियुक्त सहाय्यक यांची मदत घ्यावी. ॲपविषयी अडचणी असल्यास तलाठी, कॉमन सर्व्हिस सेंटर किंवा गावातील नियुक्त सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा. ई-पीक पाहणीद्वारे पीक नोंदणी न केल्यास ७/१२ वर पीक पेरा कोरा राहील व तो नंतर भरता येणार नाही. परिणामी पीक विमा तसेच इतर शासकीय अनुदाने व लाभ मिळविण्यात अडचणी येऊ शकतात. अवेळी पाऊस किंवा इतर नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी पीक विमा मिळण्यासाठी ७/१२ वर अचूक पीक नोंद असणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व शेतकरी बांधवांनी दि. २४ जानेवारी २०२६ पूर्वी आपल्या पिकांची ई-पीक पाहणीद्वारे नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे केले आहे.

# नशेची औषधे प्रिस्क्रिप्शनशिवाय विकू नयेत - सहाय्यक आयुक्त गजानन घिरके

**जनसंचलन/ बुलढाणा**

समाजाचे आरोग्य जपण्याची महत्त्वाची जबाबदारी औषध विक्रेत्यांवर असून नवी पिढी नशेकडे वळू नये यासाठी नशेची औषधे प्रिस्क्रिप्शनशिवाय विकू नयेत, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त (औषधे) गजानन घिरके यांनी केले. एनडीपीएस ॲक्टच्या अनुषंगाने सर्व केमिस्ट व ड्रगिस्ट बांधवांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असेही त्यांनी सूचित केले. अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने आयोजित कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रमात गजानन घिरके यांनी ड्रग अँड कॉस्मेटिक्स ॲक्ट, ड्रग अँड मॅजिक रेमेडीज ॲक्ट, मेडिकल डिव्हायसेस नियम २०१७ तसेच नार्कोटिक अँड सायकोट्रॉपिक संबंधित कायदे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. औषध विक्री करताना संबंधित कायद्यांचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. मार्गदर्शनात त्यांनी डॉक्टरांनी ङ्गशेड्युल-केफ्चे पालन करावे, घाऊक विक्रेत्यांनी कायद्याच्या चौकटीतच व्यवसाय करावा व डॉक्टरांना थेट मोठ्या प्रमाणात औषध पुरवठा टाळावा, असे स्पष्ट केले. तसेच डॉक्टरांनी आवश्यक औषधांची मागणी लिखित स्वरूपात नोंदवावी व बिलाप्रमाणेच औषधसाठा खरेदी करावा. बिना बिल औषधे



खरेदी करणे, विकणे किंवा साठवणे हा कायद्यानुसार गुन्हा असल्याची जाणीव ठेवून समाजाला निकोप सेवा देण्याची जबाबदारी पार पाडावी, असे आवाहनही त्यांनी केले. या कार्यक्रमास प्रमोद टाकळकर, पांडुरंग इंगळे तसेच इतर फार्मसिस्ट उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन गोपाळ गांधी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेचे तालुका अध्यक्ष उमेश इंगळे यांनी विशेष सहकार्य केले

# नशेची औषधे प्रिस्क्रिप्शनशिवाय विकू नयेत - सहाय्यक आयुक्त गजानन घिरके

**जनसंचलन/बुलढाणा**

समाजाचे आरोग्य जपण्याची महत्त्वाची जबाबदारी औषध विक्रेत्यांवर असून नवी पिढी नशेकडे वळू नये यासाठी नशेची औषधे प्रिस्क्रिप्शनशिवाय विकू नयेत, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त (औषधे) गजानन घिरके यांनी केले. एनडीपीएस ॲक्टच्या अनुषंगाने सर्व केमिस्ट व ड्रगिस्ट बांधवांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असेही त्यांनी सूचित केले. अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने आयोजित कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रमात गजानन घिरके यांनी ड्रग अँड कॉस्मेटिक्स ॲक्ट, ड्रग अँड मॅजिक रेमेडीज ॲक्ट, मेडिकल डिव्हायसेस नियम २०१७ तसेच नार्कोटिक अँड सायकोट्रॉपिक संबंधित कायदे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. औषध विक्री करताना संबंधित कायद्यांचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. मार्गदर्शनात त्यांनी डॉक्टरांनी ङ्गशेड्युल-केफ्चे पालन करावे, घाऊक विक्रेत्यांनी कायद्याच्या चौकटीतच व्यवसाय करावा व डॉक्टरांना थेट मोठ्या प्रमाणात औषध पुरवठा टाळावा, असे स्पष्ट केले. तसेच डॉक्टरांनी आवश्यक औषधांची मागणी लिखित स्वरूपात नोंदवावी व बिलाप्रमाणेच औषधसाठा खरेदी करावा. बिना बिल औषधे खरेदी करणे, विकणे किंवा साठवणे हा कायद्यानुसार गुन्हा असल्याची जाणीव ठेवून समाजाला निकोप सेवा देण्याची जबाबदारी पार पाडावी, असे आवाहनही त्यांनी केले. या कार्यक्रमास प्रमोद टाकळकर, पांडुरंग इंगळे तसेच इतर फार्मसिस्ट उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन गोपाळ गांधी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेचे तालुका अध्यक्ष उमेश इंगळे यांनी विशेष सहकार्य केले

# ई-पीक पाहणीची नोंदणी २४ जानेवारीपर्यंत करा; जिल्हाधिकाऱ्यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

शासनाच्या महत्त्वाकांक्षी रब्बी हंगाम ई-पीक पाहणी (डिजिटल क्रॉप सर्वे-) उपक्रमाची सुरुवात दि. १० डिसेंबर २०२५ पासून झाली असून शेतकऱ्यांनी आपल्या ७/१२ वर पीक पेरा स्वतः अँड्रॉईड मोबाईलद्वारे नोंदविणे आवश्यक आहे. शेतकरी स्तरावर पीक पाहणी करण्याची अंतिम मुदत दि. २४ जानेवारी २०२६ असून सर्व शेतकरी बांधवांनी वेळेत नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. रब्बी हंगाम २०२५ च्या ई-पीक पाहणी ( ) अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात आजपर्यंत ८९ हजार ३४०.७५ हेक्टर क्षेत्रावर तसेच एकूण ७ लाख ९९ हजार १९५ पिक पाहणी करावयाच्या ओनर प्लॉटपैकी (म ) ८० हजार ०२८ प्लॉटवर संबंधित शेतकऱ्यांनी व्हर्जन ४.०.५ या मोबाईल ॲपद्वारे आपल्या ७/१२ वर पीक नोंदणी केली आहे. सध्या जिल्ह्यात ई-पीक पाहणीची नोंदणी ३९.३२ टक्के क्षेत्रावर पूर्ण झाली असून उर्वरित क्षेत्रावर सर्व शेतकऱ्यांनी तात्काळ नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ई-पीक पाहणीसाठी व्हर्जन ४.०.५ हे ॲप अँड्रॉईड फोनवर आवश्यक असून गुगल क्रोम अपडेट करून मोबाईलमध्ये इन्स्टॉल करावे. शेत बांधावर जाऊन पीकांची नोंदणी करून माहिती अपलोड करणे अपेक्षित आहे. शेतकऱ्याकडे मोबाईल उपलब्ध नसल्यास किंवा ॲप हाताळण्यात अडचण येत असल्यास संबंधित गावचे तलाठी, कोतवाल तसेच साठी नियुक्त सहाय्यक यांची मदत घ्यावी. ॲपविषयी अडचणी असल्यास तलाठी, कॉमन सर्व्हिस सेंटर किंवा गावातील नियुक्त सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा. ई-पीक पाहणीद्वारे पीक नोंदणी न केल्यास ७/१२ वर पीक पेरा कोरा राहील व तो नंतर भरता येणार नाही. परिणामी पीक विमा तसेच इतर शासकीय अनुदाने व लाभ मिळविण्यात अडचणी येऊ शकतात. अवेळी पाऊस किंवा इतर नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी पीक विमा मिळण्यासाठी ७/१२ वर अचूक पीक नोंद असणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व शेतकरी बांधवांनी दि. २४ जानेवारी २०२६ पूर्वी आपल्या पिकांची ई-पीक पाहणीद्वारे नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे केले आहे.

# राज्य क्रीडा दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणाद्वारे गुरुवार दि.१५ जानेवारी रोजी ऑलिंपिक वीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्म दिवस राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त जिल्ह्यात विविध कार्यक्रम घेतले जाणार असून या उपक्रमास सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर यांनी केले आहे. दिवंगत खाशाबा जाधव ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा, हेलसिंकी येथे १९५२ मध्ये वैयक्तिक क्रीडा प्रकारातील कुस्तीमध्ये पहिले कास्य पदक पटकावून देशाच्या क्रीडा क्षेत्रात ऐतिहासीक कामगिरी केली आहे. त्यांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरी राज्याचा बहुमान असून नवोदित खेळाडुंना प्रोत्साहन व प्रेरणा देण्याकरीता राज्यभरात त्यांचा जन्मदिवस १५ जानेवारी क्रीडा दिन म्हणुन साजरा केला जातो.

या दिवसानिमित्त जिल्ह्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच प्राथमिक व माध्यमिक शाळा, कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालय, एकविध क्रीडा संघटना, क्रीडा मंडळ, क्रीडा केंद्र, स्पोर्ट्स क्लब इत्यादींनी विविध स्पर्धेचे आयोजन व विजेत्यांना पुरस्कार वितरण, शाळेतील राज्यस्तर, राष्ट्रीयस्तर क्रीडापटूंचे गौरव, विद्यार्थ्यांना यशस्वी खेळाडुंबाबत मार्गदर्शन, समुपदेशन, नामवंत खेळाडुसोबत संवाद साधणे आदी कार्यक्रम आयोजित करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सोबतच खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व क्रीडा क्षेत्रातील योगदानावर प्रकाश, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, पालक, क्रीडा प्रेमी नागरीक यांच्यासोबत करीअर संदर्भात परीसंवाद व चर्चासत्र, आपल्या संघटना, क्लब, केंद्रातील खेळाडूंना चर्चासत्र व परीसंवाद, स्पर्धा, उत्कृष्ट खेळाडूंचा गौरव व पुरस्कार देणे याप्रमाणे विविध उपक्रमांचे आयोजन करुन हा दिवस साजरा करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे.

# भूजल व्यवस्थापन आणि साठा विषयावर कार्यशाळा

## जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यशाळेचे आयोजन

**वृत्तसंस्था/ जळगाव**

जल शक्ति मंत्रालय,जल संसाधन, नदी विकास आणि गंगा संरक्षण यांच्या निर्देशानुसार, बुलढाणा जिल्ह्यातील भूजल साठ्याची सद्यस्तिथी, त्यांचे शास्त्रीय व्यवस्थापन आणि भूजल माहितीचा प्रभावी वापर या विषयावर केंद्रीय भूमिजल बोर्ड, नागपूर यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी दि. ७ जानेवारीला कार्यशाळा संपन्न झाली. तसेच भूजल माहितीचे प्रसारण आणि उपयोग व राष्ट्रीय जलभृत मानचित्रण आणि प्रबंधन कार्यक्रम यावर आधारित या कार्यशाळेतून जलसंधारणाचा आराखडा मांडण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यशाळेची सुरुवात केंद्रीय भूमिजल बोर्ड, नागपूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ एस.एस. पुरती यांच्या उदघाट्नपर भाषणाने झाली. त्यानंतर वैज्ञानिक प्रिती डी .राऊत यांनी बुलढाणा जिल्ह्यासाठीच्या ङ्गङ्गराष्ट्रीय जलभृत मानचित्रण आणि प्रबंधन कार्यक्रमङ्गङ्ग यावर सविस्तर सादरीकरण केले. यामध्ये जिल्ह्यातील जलभंडाराची वैशिष्ट्ये, उपलब्ध भूजल संसाधने आणि भविष्यातील पाणी व्यवस्थापन धोरणांचा आढावा घेण्यात आला. कार्यशाळे दरम्यान, ङ्गराष्ट्रीय भूजलस्तर नकाशा अहवाल-बुलढाणा जिल्हाफ आणि देशातील कृत्रिम पुनर्भरण संरचनांच्या यशोगाथांवरील कॉफी टेबल बुकचे औपचारिकपणे प्रकाशन करण्यात आल. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी भूजल माहितीच्या प्रसारासाठी सीजीडब्ल्यूबीच्या प्रयत्नांचे कौतुक केले. शेतकरी आणि विविध संस्थांना माहितीची सुलभ उपलब्धता आणि प्रभावी वापरासाठी, सीजीडब्ल्यूबी आणि जीएसडीएच्या भूजल डेटाबेसचे संयोजन करणारे एकच व वापरण्यास सोपे एकात्मिक पोर्टल किंवा मोबाइल ॲप्लिकेशन असण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. जिल्हास्तरीय नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये या संसाधनांचा सक्रियपणे वापर करण्याचा सल्लाही त्यांनी सर्व संबंधित विभागांना दिला. त्यानंतर एका संवादात्मक अभिप्राय सत्राने कार्यशाळेचा समारोप करण्यात आला. भूजल विषयक डेटाची माहिती सर्वसामान्यांना आणि प्रशासनाला



सहज उपलब्ध व्हावी यासाठी वैज्ञानिक प्रिती राऊत यांनी ग्राऊंडवॉटर डेटा डाउनलोड पोर्टल आणि इनग्रेस, इंडिया वारीस सीजीडब्लूए या पोर्टलच्या वापराचे प्रात्यक्षिक दाखवले आणि त्रि-स्तरीय नियोजन आणि निर्णय घेण्यासाठी त्यांच्या व्यावहारिक उपयोगावर भर दिला. त्यामुळे आता एका क्लिक वर जिल्ह्याच्या भूजल पातळीची माहिती, जिल्ह्याशी निगडित अहवाल मिळणे सुलभ होईल. याप्रसंगी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक हिमानी जोशी आणि भूवैज्ञानिक हरीश कठाळे तसेच जिल्हाधिकारी कार्यालय जिल्हा परिषद, मृद व जलसंधारण, जलसंपदा, लघुपाठबंधारे, कृषि अशा विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# बुलढाण्यात चाचा नेहरू बाल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन



**जनसंचलन/बुलढाणा**

महिला व बाल विकास विभागाच्या अधिनस्त शासकीय व स्वयंसेवी बाल विकास संस्थांमधील पुनर्वसनासाठी दाखल झालेल्या अनाथ, निराधार व उन्मार्गी बालकांसाठी चाचा नेहरु बाल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव दि. १५ ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत शरद कला महाविद्यालय, हाजी मलंग दर्ग्याजवळ, चिखली रोड, बुलढाणा येथे होणार आहे. महोत्सवाच्या माध्यमातून बालकांमधील सुप्त कलागुणांना वाव देणे, त्यांच्यात बंधुभाव, सांघिक भावना व आत्मविश्वास निर्माण करणे हा मुख्य उद्देश आहे. महोत्सवात विविध सांस्कृतिक, मनोरंजनात्मक कार्यक्रमांसह क्रीडा प्रकारांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून जिल्ह्यातील विविध बाल विकास संस्थांमधील बालके या स्पर्धांमध्ये सहभाग घेणार आहेत. सदर महोत्सवाला जिल्हाधिकारी तसेच विविध विभागांतील व विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे, अशी माहिती महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी दिली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८